फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

# जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

लातूर जिल्हा

१९९६-९७

अर्थ व सांख्यिकी संचालनालय
महाराष्ट्र शासन
मुंबई

फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

# जिल्हा सांख्यिकी व आर्थिक विश्लेषण



1996 - 97

जिल्हा सांख्यिकी कार्यालय,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन,
लातूर.

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन



1996 - 97

अ नु क्र म णि का


| विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| भाग - 1 | |
| 1. दृष्टीक्षेपात जिल्हा लातूर (सामान्य माहिती व महाराष्ट्राशी तुलना) | 1 ते 8 |
| 2. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | 1 ते 19 |
| भाग - 2 | |
| 3) जिल्हा सांख्यिकी गोषवारा | 1 ते 206 |

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

# जिल्हा : लातूर

# 1996 - 97

भाग - 2

## अ नु क्र म णि का


| तक्ता क्रमांक | वि ष य | पृष्ट क्र. |
|---|---|---|
| | *क्षेत्रफळ आणि लोकसंख्या* | |
| 1.1 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे तहसिल निहाय क्षेत्रफळ | 1 |
| 1.2 | 1951 पासून लोकसंख्येमधील दशवर्षिय फरक | 2 |
| 1.3 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्येच्या गटानुसार गावांचे तहसिल निहाय वर्गीकरण | 4 |
| 1.4 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या गटानुसार शहरांचे तहसील निहाय वर्गीकरण | 6 |
| 1.5 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे काम करणारे व न करणारे यांची तहसिल निहाय संख्या | 8 |
| 1.6 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयातील लोकसंख्येचे वर्गीकरण | 10 |
| 1.7 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे तहसिल निहाय अनु.जाती, अनु.जमाती व नवबौध्द यांची आकडेवारी. | 12 |
| 1.8 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे भिंती, छपरे यासाठी वापरलेल्या साधन सामुग्री नुसार घरांचे वर्गीकरण | 13 |
| 1.9 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे आकार व मालकीच्या स्थितीनुसार ग्रामीण नागरी कुटुंबाचे वर्गीकरण | 14 |
| 1.10 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे घरे व त्यांचा वापर | 15 |
| | *हवामान* | |
| 2.1 | निवडक केंद्रातील पर्जन्य दिवसांची संख्या | 16 |
| 2.2 | निवडक केंद्रातील कमाल व किमान तापमान | 18 |
| | *कृषि* | |
| 3.1 | तहसिल निहाय जमिनीचा वापर | 19 |
| 3.2 | तहसिल निहाय निरनिराळ्या पिकाखालील क्षेत्र | 21 |
| 3.3 | मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पन्न व एकूण उत्पादन | 27 |
| 3.4 | विविध साधनांनी ओलिताखाली असलेले तहसिल निहाय क्षेत्र | 28 |
| 3.5 | निरनिराळ्या पिकाखालील ओलितांचे तहसिल निहाय क्षेत्र | 29 |

| तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 3.6अ | तहसिल निहाय सिंचन विहिरी व इतर विहिरी | 33 |
| 3.6ब | तहसिल निहाय विद्युत पंप व हात पंपाची माहिती | 34 |
| 3.7 | विहिरीखेरीज लघु पाटबंधा-याची कामे. | 35 |
| 3.8 | मध्यम व मोठ्या प्रकल्पामुळे भिजणारे क्षेत्र व मिळणारे फायदे | 36 |
| 3.9 | 1990-91 च्या कृषि गणनेनुसार विहित धारण जमिनीची संख्या व त्यांचे क्षेत्रफळ, ओलिताखाली असलेल्या विहित धारण जमिनी आणि ओलित ओलित निव्वळ क्षेत्र व वहितांच्या प्रकारानुसार आणि क्षेत्रफळानुसार वहित जमिनींची संख्या | 38 |
| 3.10 | 1992 च्या पशु गणनेनुसार तहसिल निहाय कृषि विषयक अवजारे | 41 |
| 3.11* | दुष्काळ, टंचाई सदृष्य परिस्थतीची तहसिल निहाय माहिती. | 42 |
| 3.12* | टंचाईच्या पूर्वेतिहासानुसार कठीण व टंचाईग्रस्त भाग ठरविण्या बाबतची माहिती. | 45 |
| | **पशुसंवर्धन,वने व मत्स्य व्यवसाय** | |
| 4.1 | 1992 च्या पशु गणनेनुसार तहसिल निहाय पशुधन | 47 |
| 4.2 | तहसिल निहाय पशुवैधकिय संस्था | |
| 4.3 | रोगाच्या प्रकारानुसार पशुंच्या मृत्यूंची संख्या | 51 |
| 4.4अ | तहसिल निहाय विविध पशुवैधकीय संस्थांचे कार्य | 53 |
| 4.4ब | मान्यता प्राप्त पशुवधगृहे आणि पशुवधगृहात कत्तल केलेल्या पशुंची संख्या | 54 |
| 4.5 | जिल्हयातील वनक्षेत्र | 55 |
| 4.6 | जिल्हयातील मुख्य व गौण वन उत्पादने | 56 |
| 4.7 | जिल्हयातील भुजल मत्स्य व्यवसाय | 57 |
| | **उद्योग व विज** | |
| 5.1 | कारखान्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या | 59 |
| 5.2 | चालू कारखाण्याचे कामगाराच्या संख्येनुसार उद्योगनिहाय वर्गीकरण | 63 |
| 5.3 | कामाच्या दिवसांच्या संख्येनुसार कारखान्याचे वर्गीकरण | 65 |
| 5.4 | उद्योगाच्या महत्वाच्या बाबींची आकडेवारी | 67 |
| 5.5 | रोजगार विनिमय केंद्रातील आकडेवारी | 68 |
| 5.6 | व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम | 70 |
| 5.7 | कर्मचारी गणना जिल्हयातील कर्मचा-यांची संख्या | 71 |
| 5.8 | निरनिराळ्या उद्योगांकरिता रोजगार | 72 |
| 5.9 | जिल्हयातील विद्युतीकरण झालेल्या शहरांची व गावांची संख्या | 73 |
| 5.10 | [illegible]चा वापर | 75 |
| 5.11 | [illegible] च्या आर्थिक गणनेनुसार कृषि व बिगर कृषि उद्योग | 76 |

| तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 5.12 | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार प्रमुख उद्योग गटानुसार (कृषि व बिगर कृषि) सर्वसाधारण पण नेहमी काम करणा-या कामगारांची संख्या | 78 |
| 5.13 | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार महत्वाच्या उद्योग गटानुसार कृषि आस्थापनांची संख्या | 79 |
| 5.14 | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार महत्वाच्या उद्योग गटानुसार कृषि व बिगर कृषि आस्थापनांतील कामगारांची संख्या | 80 |
| 5.15 | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार कृषि आणि बिगर कृषि आस्थापना (सर्व उद्योग गट एकत्र) | 81 |
| 5.16 | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार प्रमुख उद्योग गटानुसार सहकारी औद्योगिक संस्था व रोजगा-यांची संख्या | 82 |
| 5.17अ | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार उत्पादन व दुरुस्ती सेंवा या उद्योग गटातील स्वकार्यरत उद्योगांची संख्या व नेहमी काम करणा-या कामगारांचे आकारमान गटानुसार संख्या | 83 |
| 5.17ब | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार उत्पादन व दुरुस्ती सेंवा या उद्योग गटातील आस्थापनांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या | 84 |
| 5.18अ | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार घाऊक व किरकोळ व्यापारी स्वकार्यरत उद्योगांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या | 85 |
| 5.18ब | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार घाऊक व किरकोळ आस्थापनांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या | 86 |
| 5.19अ | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार सामुहिक सामाजिक व व्यक्तीगत सेवा स्वकार्यरत उद्योगांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या | 87 |
| 5.19ब | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार सामुहिक सामाजिक व व्यक्तीगत सेवा आस्थापनांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या | 88 |
| 5.20अ | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार सर्व उद्योग गट मिळून स्वकार्यरत एकत्र उद्योगांची संख्या व नेहमी काम करणा-या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या | 89 |
| 5.20ब | 1990 च्या आर्थिक गणनेनुसार सर्व उद्योग गट मिळून स्वकार्यरत एकत्र आस्थापनांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कामगारांची आकारमान गटानुसार संख्या | 90 |
| | सहकार | |
| 6.1 | जिल्हयातील विविध प्रकारच्या संस्था | 91 |
| 6.2 | जिल्हयातील सर्व प्रकारच्या संस्थांची माहिती. | 92 |

| तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 6.3 | जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची लेखा परिक्षा वर्गाप्रमाणे वर्गवारी | 93 |
| 6.4 | जिल्ह्यातील राज्य आणि जिल्हा पातळी सहकारी बँकाचे कार्य | 94 |
| 6.5 | जिल्ह्यातील प्राथमिक कृषि सहकारी संस्थांचे कार्य | 95 |
| 6.6* | जिल्ह्यातील शेतकरी सेवा संस्थांचे कार्य | 98 |
| 6.7* | जिल्ह्यातील आदिवासी सहकारी (लँम्प्स) संस्थांचे कार्य | 101 |
| 6.8 | जिल्ह्यातील प्राथमिक कृषि सहकारी संस्थांनी दिलेली कर्जे | 104 |
| 6.9* | जिल्ह्यातील शेतकरी सेवा सहकारी संस्थांनी दिलेली पिक कर्जे | 105 |
| 6.10* | जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी सहकारी संस्थांनी दिलेली कर्जे | 106 |
| 6.11 | जिल्ह्यातील बिगर कृषि पतसंस्थांचे कार्य | 107 |
| 6.12 | जिल्ह्यातील जिल्हा आणि प्राथमिक पणन संस्थांचे कार्य | 108 |
| 6.13 | जिल्ह्यातील उत्पादन संस्था आणि सामाजिक सेवा संस्थांचे कार्य | 111 |
| 6.14 | जिल्ह्यातील उत्पादन संस्था आणि सामाजिक सेवा यांचे महत्वाचे कार्य | 112 |
| 6.15 | जिल्ह्यातील नियंत्रीत बाजारपेठांची माहिती | 113 |
| 6.16 | जिल्ह्यातील सावकारांची संख्या आणि त्यांनी दिलेली कर्जे | 120 |
| | ***वैधकीय आरोग्य सेवा*** | |
| 7.1 | सार्वजनिक व अर्ध सहाय्यीत संस्थांमार्फत उपलब्ध असलेल्या वैधकिय सुविधांची तहसिल निहाय माहिती | 121 |
| 7.2 | नोंदणी केलेल्या जन्म मृत्यूंची संख्या | 122 |
| 7.3 | जिल्ह्यातील विविध कारणांनुसार मृत्यूंची संख्या | 123 |
| 7.4 | जिल्ह्यातील माता बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत लस टोचणी | 124 |
| 7.5 | जिल्ह्यातील कुटुंब नियोजन केंद्रांची संख्या | 125 |
| | ***शिक्षण*** | |
| 8.1 | 1991 च्या जनगणनेप्रमाणे तहसिल निहाय साक्षरता | 126 |
| 8.2 | शैक्षणिक संस्था व शिक्षकांची संख्या | 127 |
| 8.3 | पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व महाविधालयीन विधार्थ्यांची स्थर निहाय संख्या आणि मागासवर्गीय विधार्थ्यांची वर्गवारी | 128 |
| 8.4 | इतर प्रकारच्या शैक्षणिक संस्थांची माहिती. | 129 |
| 8.5 | आर्थिक दृष्टया मागासलेल्या विधार्थ्यांना मिळणारी मोफत शिक्षणाची सवलत याबाबतची माहिती | 130 |
| 8.6 | प्राथमिक शिक्षणावरील खर्च | 131 |
| 8.7 | जिल्ह्यातील व्यवसाय मार्गदर्शन ( कनिष्ठ महाविधालय ) व तांत्रिक शाळा आठवी ते बारावी | 132 |
| 8.8 | जिल्ह्यातील प्रौढ शिक्षण केंद्रे | 133 |
| 8.9 | शिक्षकांकरीता प्रशिक्षण संस्था | 134 |

| तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | *परिवहन व दळणवळण* | |
| 9.1अ | जिल्हयातील रेल्वे मार्गांची लांबी | 135 |
| 9.1ब | जिल्हयातील रेल्वे स्थानकांची तहसिल निहाय यादी | 136 |
| 9.2 | प्रकार व पृष्ठ भागानुसार रस्त्यांची लांबी | 137 |
| 9.3 | जिल्हयातील वापरात असलेल्या मोटार वाहनांची संख्या | 138 |
| 9.4 | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची (प्रवासी) वाहतूक आकडेवारी | 139 |
| 9.5 | महत्वाच्या रस्त्यावरील वाहतूक गणना | 140 |
| 9.6 | जिल्हयातील पोस्ट, तार घरे, दुरध्वनी सेवा व दूरदर्शन संच यांची आकडेवारी | 142 |
| | *स्थानिक संस्था* | |
| 10.1 | स्थानिक संस्थेचे उत्पन्न व खर्च | 143 |
| 10.2 | ग्रामपंचायतीचे उत्पन्न व खर्च | 144 |
| 10.3 | जिल्हा परिषदेचे बाबवार उत्पन्न व खर्च | 147 |
| 10.4 | नगरपालिकांचे उत्पन्न व खर्च | 150 |
| | *नियोजन विषयक माहिती* | |
| 11.1 | विविध विकास शिर्षाखालील झालेला योजनांतर्गत खर्च | 151 |
| 11.2 | योजनांखालील महत्वाची भौतीक साध्ये | 152 |
| 11.3 | रोजगार हमी योजना | 160 |
| 11.4 | रोजगार हमी योजनेखाली घेतलेली कामे व त्यावरील रोजगार व खर्च | 161 |
| 11.5 | पिण्याच्या पाण्याच्या सोयी व टंचाईसंबंधी केलेल्या उपाय योजना | 162 |
| 11.6 | संकरीत अधिक उत्पादन देणा-या पिकांच्या जाती व त्याखालील क्षेत्र | 163 |
| 11.7 | रासायणीक खतांचे वाटप | 165 |
| 11.8 | जिल्हयातील साखर कारखाने | 166 |
| 11.9 | जिल्हयातील दुग्ध संस्थांची माहिती | 166 |
| 11.10 | अवर्षण प्रवण कार्यक्रमांची प्रगती | 167 |
| 11.11* | एकात्मीक आदिवासीविकास कार्यक्रमाची प्रगती व त्यावरील तरतूद खर्च | 168 |
| 11.12 | विस कलमी कार्यक्रम | 170 |
| 11.13 | विशेष घटक योजना | 171 |
| 11.14अ | जिल्हयाचा स्थानिक विकास कार्यक्रम (लोकसभा मतदार संघ) | 172 |
| 11.14ब | जिल्हयाचा स्थानिक विकास कार्यक्रम (विधानसभा मतदार संघ) | 172 |
| 11.14क | जिल्हयाचा स्थानिक विकास कार्यक्रम (विधानपरिषद मतदार संघ) | 173 |
| | *किंमती व निर्देशांक* | |
| 12.1 | निवडक शेतीमालाच्या सरासरी घाऊक किंमती | 174 |
| 12.2 | जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणच्या महत्वाच्या वस्तूंच्या सरासरी | 175 |

| तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 12.3 | कोल्हापूर केंद्रांचे कामगारांचे ग्राहक किंमती निर्देशांक | 182 |
| | *न्याय, पोलिस व कारागृहे* | |
| 13.1 | जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांची एकूण संख्या | 182 |
| 13.2 | गुन्ह्यांसंबंधी आकडेवारी | 183 |
| 13.3 | तुरुंगात दाखल केलेले गुन्हेगार | 185 |
| 13.4 | तुरुंगात दाखल झालेल्या गुन्हेगारांची वयोगटानुसार व शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण | 186 |
| 13.5 | दिवाणी व फौजदारी न्यायालयात निकालात काढलेली कामे | 187 |
| | *बँका, संयुक्त भांडवली संस्था व विमा* | |
| 14.1 | बँक कार्यालये, वर्गीकृत बँकांची संख्या व त्यांच्या ठेवी व कर्जे | 188 |
| 14.2 | संयुक्त भांडवली संस्था | |
| 14.3 | उतरविलेल्या विमा पत्रांची संख्या व विम्याची रक्कम | 190 |
| | *संकीर्ण* | |
| 15.1 | चित्रपट गृहां विषयी आकडेवारी | 191 |
| 15.2 | जिल्ह्यातील गोळा केलेली अल्प बचतीची रक्कम | 192 |
| 15.3 | तहसिल निहाय गोळा केलेला जमिन महसूल | 193 |
| 15.4 | छापखाने, छापलेली व प्रकाशीत केलेली वर्तमान पत्रे-नियत कालीके | 194 |
| 15.5 | स्वस्त धान्य दुकानाला पुरविलेले तांदुळ, गहू, साखर | 196 |
| 15.6 | मागणी व वसूल केलेले धान्य | 197 |
| 15.7 | 1997 मधील लोकसभा व 1995 मधील विधानसभा निवडणूक यासंबंधी आकडेवारी | 198 |
| 15.8 | अधिकारी व प्रवासी यांच्यासाठी असलेल्या बंगल्यांची तहसिल निहाय यादी | 201 |
| 15.9 | निवडक निर्देशांकाचे कल | 202 |


रवि काळे/-/

# दृष्टिक्षेपात जिल्हा :- लातूर

| अ.क्र. | बाब | परिमाण | लातूर | महाराष्ट्र राज्य |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| एक. | प्राकृतिक रचना | | | |
| अ) | भौगोलिक स्थान | | | |
| | 1) उत्तर अक्षांश | अंश | 18.05 ते 16.4 अंश | 18.75ते 22.1 अंश |
| | 2) पूर्व रेखांश | अंश | 76.25 ते 72.6 अंश | 77.25 ते 80.9 अंश |
| ब) | हवामान ( 1996 ) | | | |
| | तापमान | | | |
| | 1) किमान | डिग्री सेल्सियस | 14.3 | 4.8 |
| | 2) कमाल | डिग्री सेल्सियस | 40.3 | 47.1 |
| | 3) पर्जन्य | मि. मि. | 1018.6 | 1035.16 |
| क) | प्रशासकीय विभाग ( 1996 -97 ) | | | |
| | 1)तहसिल | संख्या | 7 | 325 |
| | 2)पंचायत समित्या | संख्या | 7 | 317 |
| | 3)टंचाईग्रस्त तालुके | संख्या | उ.ना | उ.ना. |
| | 4)एकात्मिक ग्रामिण विकास प्रकल्प | संख्या | 2 | -- |
| | 5) शहरे | संख्या | 5 | 336 |
| | 6) गावे ( एकूण ) | संख्या | 936 | 43864 |
| | 1) निर्जन | संख्या. | 22 | 2613 |
| | 2) वस्ती असलेली | संख्या | 914 | 41251 |
| | 7) क्षेत्रफळ | चौरस कि.मी. | 7372 | 307713 |
| दोन | प्रशासकिय संस्था ( 1996 - 97 ) | | | |
| - | 1) पंचायत समित्या | संख्या | 7 | 317 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| | 2) महानगरपालिका | संख्या | - | 13 |
| | 3) नगरपरिषदा | संख्या | 5 | 232 |
| | 4) कटक मंडळे | संख्या | - | 7 |
| | | | | 31-12-94 |
| | 5) ग्रामपंचायती | संख्या | 781 | 27620 |
| | 6) पोलीस ठाणी ( 1996-97 | संख्या | 20 | 1751 |
| | 7) पोलीस औट पोस्ट ( 31 - 12 - 1994 ) | संख्या | 16 | 731 |
| तीन | लोकसंख्या ( 1991 ) | | | |
| | 1) ग्रामीण लोकसंख्या | आकडे हजारात | 1335 | 48396 |
| | 2) नागरी लोकसंख्या | आकडे हजारात | 342 | 30541 |
| | 3) एकूण लोकसंख्या | आकडे हजारात | 1677 | 78937 |
| | 4) अनुसूचित जातींची लोकसंख्या | आकडे हजारात | 320 | 8758 |
| | 5) अनुसूचित जातींच्या लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | टक्केवारी | 19.06 | 11.09 |
| | 6) अनुसूचित जमातींची लोकसंख्या | आकडे हजारात | 38 | 7318 |
| | 7) अ.ज. लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | टक्केवारी | 2.24 | 9.27 |
| | 8) पुरुष | आकडे हजारात | 863 | 40826 |
| | 9) स्त्रिया | आकडे हजारात | 813 | 38112 |
| | 10 स्त्री- पुरुष प्रमाण | 1000, पुरुषा-मागे स्त्रियांचे प्रमाण | 942 | 934 |
| | 11) घनता | दर चौरस कि. मी. क्षेत्रातील लोकसंख्या | 227 | 257 |
| | 12) साक्षरतेचे प्रमाण 1991 | | | |
| | 1) एकूण | टक्केवारी | 55.57 | 64.87 |
| | 2) पुरुष | टक्केवारी | 70.47 | 76.6 |
| | 3) स्त्रिया | टक्केवारी | 39.74 | 52.3 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| | 4) राज्यामध्ये जिल्हयाचा क्रमांक | संख्या | 23 | - |
| चार | कृषी ( अस्थाई ) | | | |
| | ---------- | | 1995-96 | 1996-97 |
| | 1) भौगोलिक क्षेत्र | हजार हेक्टर | 716 | 30758 |
| | 2) जंगलव्याप्त क्षेत्र | हजार हेक्टर | 3 | 5274 |
| | त्याची भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | टक्केवारी | 0.42 | 17.15 |
| | 3) शेतीला उपलब्ध नसलेली जमीन | | | |
| | अ) बिगर शेती वापरा-खालील जमीन | हजार हेक्टर | 16 | 1249 |
| | ब) पडीक आणि लागवडी लायक नसलेली जमीन | हजार हेक्टर | 11 | 1711 |
| | क) एकूण ( अ व ब ) | | 26 | 2960 |
| | 4 ) पडीक जमिनीव्यतिरिक्त लागवड न केलेली इतर जमीन | | | |
| | 1) कायम गुरेचरण आणि इतर | हजार हेक्टर | 17 | 1357 |
| | 2) झाडे झुडपाखालील जमीन | हजार हेक्टर | 5 | 226 |
| | 3) लागवडीयोग्य परंतु पड जमीन | हजार हेक्टर | 15 | 891 |
| | 5) पडीक जमीन | | | |
| | 1) चालू पड | हजार हेक्टर | 41 | 1049 |
| | 2) इतर पड | हजार हेक्टर | 14 | 1126 |
| | 6) पिका खालील क्षेत्र | | | |
| | 1) पिकाखालील निव्वळ क्षेत्र | हजार हेक्टर | 595 | 17876 |
| | 2) दुसरा क्षेत्र | हजार हेक्टर | 68 | 3786 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| | 3) एकूण पिकाखालील क्षेत्र | हजार हेक्टर | 663 | 21662 |
| | 7) ओलित क्षेत्र | | ( 1995-96) | (1996 - 97) |
| | 1) निव्वळ ओलित क्षेत्र | हजार हेक्टर | 33 | 2549 |
| | 2) एकूण ओलित क्षेत्र | हजार हेक्टर | 37 | 3338 |
| | 8) महत्वाच्या पिकाखालील क्षेत्र (अन्नधान्य) | हजार हेक्टर | 12 | 13793 |
| | 9) वहित धारण जमीन अंतिम ( 1990 - 91 ) | | | |
| | 1) 2 हेक्टर पेक्षा कमी | संख्या हजारात | 116 | 6003 |
| | 2) 2 ते 10 हेक्टर | संख्या हजारात | 111 | 3297 |
| | 3) 10 हेक्टरपेक्षा जास्त | संख्या हजारात | 5 | 170 |
| | 10) जमीन महसूल वसुली ( 1996 - 97 ) | लाख रुपये | 89.9 | 10996 |
| | 11) जिल्हा परिषदेचा उपकर | हजार रुपये | 10263 | उ.ना. |
| | 12) पंचायत समित्याचा उपकर | हजार रुपये | 3614 | उ.ना. |
| पाच | पशुसंवर्धन (पशुगणना ( 1992 ) | | अस्थाई | स्थाई |
| | 1) एकूण पशुधन | संख्या हजारात | 855 | 36393 |
| | 2) गाई व बैल | संख्या हजारात | 390 | 17441 |
| | 3) म्हशी व रेडे | संख्या हजारात | 196 | 5447 |
| | 4) मेंढया | संख्या हजारात | 44 | |
| | 5) शेळया | संख्या हजारात | 170 | 13015 |
| | 6) कोंबडया व बदके | संख्या हजारात | 206 | 32187 |
| सहा | सहकार ( 1996 - 97 ) | | | |
| | 1 )सहकारी संस्था | संख्या | 2646 | 136785 |
| | 2 )प्राथमिक कृषि सहकारी | संख्या | 573 | 20104 |
| | 3 )प्राथमिक कृषि सहकारी पथसंस्थाची सभासद संख्या | संख्या हजारात | 283 | 8930 |
| | 4 ) सहकारी दुग्ध संस्था | संख्या | 665 | 20145 |
| | 5 ) प्राथमिक कृषि पतसंस्थानी दिलेली कर्जे | रुपये कोटीत | 33.59 | 1661 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| सात | जलसिंचन ( 1996 - 97 ) च्या अखेरपर्यंत पूर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्याखालील लाभक्षेत्र | | जून 97 | 96-97 |
| | 1) मोठे प्रकल्प | संख्या | 2 | 33 |
| | 2) मध्यम प्रकल्प | संख्या | 8 | 177 |
| | 1 व 2 चे लाभक्षेत्र | हजार हेक्टर | 69 | उ.ना. |
| | 3) लघुप्रकल्प (राज्यक्षेत्र) | संख्या | 13 | 1700 |
| | लाभक्षेत्र | हजार हेक्टर | 9 | उ.ना. |
| | 4) सिंचन विहिरीखाली भिजणारे क्षेत्र | हजार हेक्टर | 27 | 1392 |
| आठ | उद्योग 1996 अखेर | | | |
| | 1) नोंदणीकृत कारखान्यांची संख्या | संख्या | 175 | 32152 |
| | 2) नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या (उत्पादन चालू कारखाने ) | संख्या | 144 | 27668 |
| | 3) सहकारी साखर कारखान्यांची संख्या 96-97 | संख्या | 3 | 102 |
| | 4) सहकारी साखर कारखान्यातील उत्पादन (1996-97) | हजार मे.टन | 83 | 3364 |
| | 5) सर्व सूत गिरण्यांची संख्या(1996-97) | संख्या | 6 | 226 |
| नऊ | बीज दि.31/3/97 अखेर | | | 31-3-89 |
| | 1) वीज पुरवठा केलेली शहरे व खेडे | संख्या | 919 | 39413 |
| | 2) विद्युतीकरण झालेल्या गावांची संख्या | संख्या | 914 | उ.ना. |
| | 3) विज पुरवठा केलेले विज पंप(मार्च 97 पर्यंत) | संख्या हजारात | 58 | 2092 |
| | 4) बसविण्यात आलेली गोबरगॅस संयंत्रे | संख्या | 9351 | उ.ना. |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| दहा | सार्वजनिक आरोग्य 1996 | | 1996-97 | 1996 |
| | 1) रुग्णालये | संख्या | 11 | 741 |
| | 2) दवाखाने P.H.C. म्हणून श्रेणीवाढीसुध्दा संख्येत घट | संख्या | 18 | 1423 |
| | 3) प्राथमिक आरोग्य केंद्रे | संख्या | 44 | 1695 |
| | 4) प्रा.आरोग्य पथके(अस्थाई) | संख्या | - | 161अस्थाई |
| अकरा | शिक्षण 1996-97 | | 1995-96 | 1996-97 |
| | 1) एकूण प्राथमिक शाळा | संख्या | 1338 | 63230 |
| | 2) प्रा.शाळेतील विधार्थी | संख्या '000' | 316 | 11972 |
| | 3) प्रा.शाळेतील शिक्षक | संख्या '000' | 8 | 304 |
| | 4) प्रत्येक शिक्षकामागे शाळेतील विधार्थी | संख्या | 39 | 39 |
| बारा | माध्यमिक शिक्षण उच्च माध्यमिक सह(1996-97) | | 1995-96 | 1996-97 |
| | 1) दुय्यम शाळा | संख्या | 465 | 14872 |
| | 2) शाळेतील एकूण विधार्थी | संख्या '000' | 132 | 7947 |
| | 3) शाळेतील शिक्षक | संख्या '000' | 4 | 237 |
| | 4) प्रत्येक शिक्षकामागे माध्यमिक शाळेतील विधार्थी | संख्या | 29 | 34 |
| तेरा | उच्च शिक्षण (1996-97) | | | |
| | 1) संख्या | संख्या | 19 | 1392 |
| | 2) एकूण विधार्थी | संख्या'000' | 29 | 853 |
| चौदा | अ) प्रौढ शिक्षण | | | |
| | 1) प्रौढ शिक्षण केंद्र | संख्या | 6530 | उ.ना. |
| | 2) प्रौढांची उपस्थिती (साक्षर) | संख्या'000' | 164 | उ.ना. |
| | ब) तांत्रिक व्यवसाय शिक्षण | | 1996-97 | 1995-96 |
| | 1) औधोगिक प्रशिक्षण संस्था | संख्या | 9 | 485 |
| | a' शासकीय | संख्या | 6 | 241 |
| | b' अशासकीय | संख्या | 3 | 244 |
| | 2) शासकीय व अशासकीय औधोगिक प्रशिक्षण संस्थांची एकूण क्षमता | संख्या | 1648 | 76416 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| | 3) पदवी अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था व त्यांची पहिल्या वर्षासाठी प्रवेश क्षमता | संख्या | 3 | 94 |
| | | संख्या | 540 | 23351 |
| | 4) पदविका अभ्यासक्रमाच्या तांत्रिक संस्था व त्यांची पहिल्या वर्षासाठी प्रवेश क्षमता. | संख्या | 5 | 182 |
| | | संख्या | 830 | 31416 |
| | 5) व्यवसाय शिक्षण संस्था (माध्य. व उच्च माध्य.गट) | संख्या | 45 | उ.ना. |
| | व त्यांची प्रवेश क्षमता. | हजारात | 3 | उ.ना. |
| पंधरा | परिवहन आणि दळणवळण (मार्च 1997 अखेर) | | | |
| | 1) एकूण रेल्वे मार्ग लांबी | कि.मी. | 148 | 5554 |
| | 2) रस्त्यांनी जोडलेली गावे (1995-96) | | | |
| | अ. बारमाही | संख्या | 771 | 26756 |
| | ब. हंगामी | संख्या | 108 | 8480 |
| | 3) एकूण रस्त्यांची लांबी (पृष्ठांकीत) | कि.मी. | 5472 | 157394 |
| | 4) राष्ट्रीय महामार्गांची लांबी | कि.मी. | 0 | 2958 |
| | 5) राज्य महामार्गांची लांबी | कि.मी. | 789 | 32359 |
| | 6) महत्वाच्या जिल्हा रस्त्यांची लांबी | कि.मी. | 1702 | 41081 |
| | 7) इतर जिल्हा रस्त्यांची लांबी | कि.मी. | 1538 | 41043 |
| | 8) ग्रामीण रस्त्यांची लांबी | कि.मी. | 1443 | 70134 |
| सोळा | एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम | | (1982-83) | (1992-93) |
| | 1) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे च्या सर्वेक्षणानुसार | संख्या लाखात | 0.84 | 77.65 (अस्थाई) |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| | 2) 1996-97 चालूतील | | | |
| | जुने लाभार्थी | संख्या | | 6987 |
| | नवे लाभार्थी | संख्या | 6286 | 154031 |
| | एकूण | संख्या | 6286 | 161018 |
| सतरा | रोजगार निर्मिती(1996-97 | | | |
| | अ. रोजगार हमी योजना | म.दि.लाखात | उ.ना. | 901.14 |
| | ब. जवाहर रोजगार कार्यक्रम (अखेर) | --"-- | 12.46 | 455.08 |
| अठरा | आदिवासी कल्याणकारी योजना | | 1996-97 | 1995-96 |
| | आदिवासी करीता | | | |
| | आश्रम शाळा | संख्या | 48 | 731 |
| | विधार्थी | संख्या | 4100 | 248298 |
| एकोणिस | मागासवर्गीयां-साठी कल्याणकारी योजना (1994-95) | | | |
| | 1) मागासवर्गीयांसाठी वसतिगृहे | संख्या | 1996-97<br>13 | 1994-95<br>192 |
| | 2) वसतिगृहात राहणारे विधार्थी | संख्या | 970 | 12797 |
| वीस | जिल्हा नियोजन (1996-97 | | | |
| | 1) वार्षिक योजनेतील मंजूर तरतूद | रुपये कोटीत | 39.02 | 4079.20 |
| | 2) अनुशेष भरुन काढण्या साठी तरतूद | रुपये कोटीत | 29.94 | 338.06 |
| एकविस | नागरी पुरवठा (96-97) | | | |
| | 1) रास्त भावाची दुकाने | संख्या | 1284 | 42716 |
| | 2) पुरविलेला एकूण साठा | | | |
| | अ. गहू | हजारटन | 13 | 1010 |
| | ब. तांदूळ | हजारटन | 7 | 858 |
| | 3) शासकीय गोदामे | संख्या | 27 | 840 |
| | साठविण्याची क्षमता जून 1997 अखेर | मे.टन | 19 | 563061 |

टिप: उ.ना. = उपलब्ध नाही.

आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई

महेश ठाकूर/-

# जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन
## जिल्हा : लातूर

उस्मानाबाद जिल्हयाचे विभाजन करुन दिनांक 16.08.1982 रोजी लातूर या नवीन जिल्हयाची निर्मिती करण्यात आली. या नवनिर्मित लातूर जिल्हयात पुर्वीच्या उस्मानाबाद जिल्हयातील, लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा व औसा अशा पाच तालुक्यांचा तसेच बीड जिल्हयातील अंबेजोगाई तालुक्यातील रेणापूर सर्कलमधील रेणापूरसह 43 गावांचा समावेश करण्यात आला. 15 ऑगस्ट 1992 रोजी पुर्वीच्या तालुक्यांची पुर्नरचना करण्यात येऊन रेणापूर व चाकूर हे दोन तहसील अस्तित्वात आले. सध्या लातूर जिल्हयात लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा, रेणापूर व चाकूर असे सात तालुके आहेत.

### लातूर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

लातूर जिल्हयाला प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. जिल्हा मुख्यालय लातूर हे 'रट्ट' वा राष्ट्रकुट राजांचे मुळ निवासस्थान होते. राष्ट्रकुट राजा अमोघवर्ष पहिला हा लट्टालूट नगरचा अधिपती "स्वामी" असल्याचे नमूद आहे. व त्यानेच हया शहराचे निर्माण केले. इ.स. 753 मध्ये बदामीच्या चालुक्यानंतर आलेले राष्ट्रकुट राजे स्वतःला लट्टालूट पूर्वाशिष म्हणजे लट्टालूट निवासी असेच म्हणवून घेत.

चालुक्य घराण्यातील विक्रमादित्य 6 व्या नंतर त्याचा पुत्र सोमेश्वर 3 रा हा गादीवर आला. त्याने "अभिलाषीतीर्थ चिंतामणी" हा ग्रंथ लिहिला, त्यामुळे त्याला "सर्वज्ञ चक्रवर्ती" असे म्हणत. लातूर जिल्हयात त्याचे राज्य असल्याचा व त्याच्या कारकिर्दीची नोंद असलेला कोरीव लेख सापडला आहे. त्यामध्ये लातूर येथील पापविनाशन देवीचे मंदीर बांधल्याचा उल्लेख आहे. सदर कोरीव लेख शके 1049 (इ.स. 1128) मध्ये कोरल्याचा उल्लेख आहे. चालुक्यानंतर हा भाग देवगिरीच्या यादवांच्या अधिपत्याखाली आला. इ.स. 1337 मध्ये यादवांचे सत्ता दिल्लीच्या सुलतानाच्या ताब्यात आले. व दक्षिणेत मुस्लीम सत्तेचा अंमल सुरु झाला. इ.स. 1351 मध्ये दिल्लीच्या सुलतानाच्या साम्राज्यातील हा भाग बहामणी साम्राज्यात आला. बहामणी साम्राज्याची राजधानी गुलबर्गा होती. तदनंतर बहामणी राज्याची शकले होऊन शेवटी निजामशाही मध्ये हा भाग आला. निजामाचे हैद्राबाद राज्य 1948 मध्ये स्वतंत्र भारतात सामील झाल्यानंतर हा भाग महाराष्ट्र राज्यात आला.

### जिल्हयातील महत्वाची ठिकाणे व शहरे :

1) अहमदपूर : तहसील मुख्यालयाचे ठिकाण असून लातूर नांदेड रोडवर लातूर पासून 60 कि.मी. अंतरावर आहे. या शहरासाठी 1945 साली नगरपरिषदेची स्थापना झाली असून नगरपरिषदेची हद्द 18.14 चौ. कि.मी. आहे. अहमदपूर शहराची लोकसंख्या 35878 इतकी आहे. येथे नागेंद्रभारती मठ असून हा मठ म्हणजे अक्कलकोटच्या स्वामीच्या गुरुची समाधी आहे. शहरात बालाजी, माहुरची देवी, महादेव व दत्ताची मंदीरे आहेत.

पान क्रं. 2 वर पहा

2) औसा : तहसील मुख्यालयाचे ठिकाण असून लातूरच्या दक्षिण पश्चिमेस 20 कि. मी. अंतरावर आहे. औसा शहराची लोकसंख्या 23246 असून येथे नगरपरिषद असून नगरपरिषदेची स्थापना 1953 साली झाली आहे. नगरपरिषद हद्द 5.66 चौ. कि. मी. आहे. येथील महत्वाचे आकर्षण म्हणजेच औशाचा ऐतिहासिक भुईकोट किल्ला. हा किल्ला जवळजवळ 5 हेक्टर क्षेत्रावर औसा शहराच्या दक्षिणेस आहे. किल्ल्याच्या सभोवतालला खोल खंदक आहे. आता तसा किल्ल्याचा बराच भाग भग्न अवस्थेत आहे. तसेच शहरात विरनाथ महाराजाचे भव्य मंदीर आहे. लिंगायत पंथातील भागवत परंपरेचे प्रतिक म्हणून हे मंदीर सर्व दूर प्रसिध्द आहे. हे मंदीर सुमारे 300 वर्षापूर्वी विरनाथ महाराजाचे सुपूत्र मल्लीनाथ महाराज यांनी बांधले आहे. या मंदीरात जेष्ठ शुध्द व्दादशीस मोठा उत्सव होतो. हा उत्सव सात दिवस चालतो या उत्सवास जिल्हयातील तसेच राज्यातील व कर्नाटकातील जवळपास 1 ते 1॥ लाख लोक जमतात.

3) खरोसा : औसा तालुक्यात औशापासून 26 कि. मी. अंतरावर लातूर बिदर-महागार्गावर छोटेशे खेडे आहे. परंतू येथे बौध्दकालीन प्राचीन लेणी आहेत. येथील महादेव लेणी सुंदर व भव्य असून पहाण्यासारखी आहे.

4) लातूर : लातूर जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण अतिप्राचीन शहर आहे. हे शहर मंजरा व तावरजा नद्याच्या खो-यात आहे. लातूर हे ऐतिहासिक शहर असून राष्ट्रकूट वंशाची मुळ राजधानी होती. वहातुकीच्या सुविधेमुळे लातूर शहराला व्यापारी महत्व आहे. येथील गोलाकार व्यापारीपेठ हे खास आकर्षण आहे. सायकलच्या चाकाप्रमाणे मध्य बिंदूस गंजगोलाई म्हणून संबोधले जाते. मध्य बिंदूवर अंबाबाईचे भव्य मंदीर आहे. त्याचप्रमाणे गावाच्या उत्तरेस सिध्देश्वराचे भव्य मंदीर असून हे मंदीर राजा तामध्वजाने बांधल्याचा उल्लेख सापडतो. हेच लातूरचे ग्रामदैवत आहे. या व्यतिरिक्त रामलिंगेश्वर, पापविनाशन भुतेश्वर, राममंदीर, दत्तमंदीर व केशवराज मंदीर अशी प्राचीन मंदीरेही आहेत. येथे "अ" वर्ग नगरपरिषद असून नगरपरिषदेची स्थापना 1935 मध्ये झालेली आहे. लातूर शहराची लोकसंख्या 1991 च्या जनगणनेप्रमाणे 197408 झाली आहे.

4) निलंगा : तालुका मुख्यालयाचे ठिकाण असून 1991 च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या 24883 इतकी आहे. नगरपरिषदेची स्थापना 1944 ला झाली असून येथे इ. स. 12 व्या शतकात निलंगेश्वराचे मंदीर हेमाडपंथी वास्तू कलेने बांधलेले आहे. त्यावरुनच गावाचे नांव निलंगा असे पडले.

5) उदगीर : तालुका मुख्यालय व ऐतिहासिक शहर, शहराची 1991 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 70453 इतकी असून येथे 1953 पासून नगरपरिषद स्थापन झालेली आहे. पुर्वीच्या काळी संपूर्ण उदगीर शहराला भव्य तटबंदी होती. तसेच येथील किल्ला हा अतिशय भव्य व मजबूत आहे. तसेच इ. स. 1760 मध्ये निजाम व मराठे यांच्यातील प्रसिध्द लढाई उदगीर येथेच झालेली आहे. हे जिल्हयातील दुस-या क्रमांकाचे शहर असून कर्नाटक राज्याच्या सरहद्दीजवळील मोठे व्यापारी शहर आहे. तसेच उदगीर तालुक्यातील देवणी जातीचे बैल हे भारतभर प्रसिध्द आहेत.

पान क्रं. 3 वर पहा..

**भौगोलिक स्थान व प्राकृतिक रचना :**

1) भौगोलिक स्थान : लातूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण-पूर्वस (अग्नेय) असून उत्तर अक्षांश 18.5 ते 18.7 व पूर्व रेखांश 73.25 ते 77.25 अंशामध्ये वसलेला आहे. हा जिल्हा महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सरहद्दीवर आहे. लातूर जिल्हयाच्या पश्चिमेला व दक्षिणेस उस्मानाबाद, वायव्येस व उत्तरेस परभणी, ईशान्येस नांदेड व पूर्वेस कर्नाटकातील बिदर जिल्हा आहे.

2) क्षेत्रफळ व प्रशासकीय विभाग : लातूर जिल्हयाचे क्षेत्रफळ 7372 चौ. कि. मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या 2.39 टक्के व औरंगाबाद विभागाच्या 11.34 टक्के आहे. जिल्हयात सात तालुके व दोन महसुली उपविभाग आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

| | उपविभाग | तालुके |
|---|---|---|
| 1. | लातूर | 1. लातूर |
| | | 2. औसा |
| | | 3. रेणापूर |
| 2. | उदगीर | 1. उदगीर |
| | | 2. अहमदपूर |
| | | 3. चाकूर |
| | | 4. निलंगा |

3. गावे : 1991 च्या जनगणनेनुसार जिल्हयात एकूण 936 गावे आहेत. त्यापैकी 914 गावे वस्ती असलेली व 22 गावे ओसाड (निर्जन) आहेत. तालुकानिहाय गांवाची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्रं | तालुक्याचे नांव | गावे संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | वस्ती असलेली | ओसाड | एकूण |
| 1. | लातूर | 118 | 1 | 119 |
| 2. | अहमदपूर | 138 | 2 | 140 |
| 3. | उदगीर | 179 | 2 | 181 |
| 4. | निलंगा | 192 | 12 | 204 |
| 5. | औसा | 126 | 5 | 131 |
| 6. | रेणापूर | 76 | - | 76 |
| 7. | चाकूर | 85 | - | 85 |
| | एकूण गावे | 914 | 22 | 936 |

लातूर जिल्हयातील रेणापूर व चाकूर या तहसीलची निर्मिती 1991 च्या जनगणनेनंतर म्हणजेच 15 ऑगस्ट 1992 रोजी झाल्याने तालुकानिहाय गावांची संख्या सद्यस्थितीतील देण्यात आली आहे.

पान क्रं 4 वर पहा..

**पंचायत समिती विकासगट :**

जिल्हयात पाच पंचायत समित्या/समूहगट आहेत. त्यात 1996-97 अखेर एकूण 781 ग्रामपंचायती होत्या. पंचायत समितीनिहाय ग्रामपंचायतींची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्रं. | पंचायत समितीचे नांव | ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|
| 1. | पंचायत समिती, लातूर | 160 |
| 2. | पंचायत समिती, अहमदपूर | 185 |
| 3. | पंचायत समिती, उदगीर | 173 |
| 4. | पंचायत समिती, निलंगा | 153 |
| 5. | पंचायत समिती, औसा | 110 |
| | एकूण | 781 |

**नगरपरिषदा :**

जिल्हयात एकूण पाच नगरपरिषदा असून त्यापैकी लातूरची नगरपरिषद 'अ' वर्गात तर उदगीर नगरपरिषद 'ब' वर्गात मोडते. निलंगा, औसा व अहमदपूर या नगरपरिषदा 'क' वर्गात मोडतात.

**3. प्राकृतिक रचना :**

संपूर्ण लातूर जिल्हा बालाघाट पठारावर वसलेला आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे 540 ते 638 मीटर उंचीवर आहे. उंचवटयाच्या दृष्टीने जिल्हयाचे दोन भाग पडतात. अधिक उंची असलेला डोंगराळ भाग जिल्हयात पश्चिम व दक्षिणेकडे पसरलेला असून यात लातूर, औसा व निलंगा तालुक्यात आहे. कमी उंचीच्या पट्टयात अहमदपूर व उदगीर तालुक्यातील मन्याड, ले- ओ-एचा प्रदेश तसेच मांजरा व तावरजा नद्याच्या खो-याचा व तेरणा खो-याच

**4. नद्या व उपनद्या :**

जिल्हयात मांजरा ही मोठी नदी तेर- व धरणी हया अन्य उपनद्यासह बालाघाट पठारावरुन वाहते. तिच्या आ-. उपनद्या मलाड, तेर व लेंडी या उत्तर पठारावरुन वाहतात.

**1. मांजरा :**

जिल्हयातील मुख्य नदी असून हिचा उगम बालाघाटच्या उत्तर पठारावर बीड जिल्हयातील गौखाडी गावाजवळ आहे. उस्मानाबाद जिल्हयाच्या उत्तर सरहद्दीवरुन वाहत लातूर जिल्हयाच्या मध्य भागातून जाते व पुढे ती दक्षिण-पूर्व वाहत कर्नाटक राज्यात जाते.

पान क्रं. 5 वर पहा..

2. तेरणा :

लातूर जिल्हयाच्या दक्षिणेकडील औसा तालुक्याच्या सरहद्दीवरुन वाहत जाते व पुढे मांजरा नदीला पूर्व सरहद्दीवर मिळते. ही मांजराची मुख्य उपनदी आहे.

3. मन्याड :

ही नदी बीड जिल्हयातील धर्मापूरीजवळ बालाघाटच्या उत्तर पठारावर उगम पावते व अहमदपूर तालुक्यातून पुर्वेकडे वहात नांदेड जिल्हयात प्रवेश करते.

4. लेंडी :

ही नदी उदगीर तालुक्यातून उगम पावते व नांदेड जिल्हयात तिरु नदीला मिळते.

5. धरणी :

ही नदी वडवळ राजुच्या उत्तरेकडे तीन कि.मी. वर उगम पावते. हिची लांबी 40 कि.मी. असून ही मांजरा नदीस मिळते.

6. तावरजा :

तावरजा ही मांजरा नदीची उपनदी असून मुरुड जवळ उगम पावते व पुर्वेकडे वाहत जाऊन 50 कि.मी. वर शिवणी गावाजवळ मांजरा नदीस मिळते.

1. हवामान व पर्जन्यवृष्टी :

जिल्हयात जुनच्या मध्यापासून ऑक्टोबर अखेरपर्यंत पावसाळा, नोव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत हिवाळा व मार्च ते जुनच्या मध्यापर्यंत उन्हाळा असतो. पावसाळयात हवा दमट असते. हिवाळयात हवा कोरडी व थंड तर उन्हाळयात कोरडी व उष्ण असते. जिल्हयात वेधशाळेचे केंद्र नसल्याने हवामान विषयक माहिती जवळच्या उस्मानाबाद केंद्राची घेण्यात आली आहे. डिसेंबर हा सर्वाधिक थंडीचा महिना असतो. 1996 मध्ये सर्वाधिक तापमान 40.3 मे या महिन्यात होते तर सर्वात कमी तापमान 14.3 डिसेंबर महिन्यात होते.

दक्षिण पठारावरील इतर जिल्हयाप्रमाणे या जिल्हयात दक्षिण पश्चिम मान्सूनचा पाऊस पडतो. जुनच्या मध्यावर पर्जन्यवृष्टीस सुरुवात होते. जुलै, ऑगस्ट महिन्यात पर्जन्यमान अधिक असते. 1996 या वर्षात जिल्हयात सरासरी 1019 मी.मी. पर्जन्यवृष्टी झाली. लातूर जिल्हा हा कृषी हवामान विषयक विविध प्रकारापैकी अशाश्वत पर्जन्यवृष्टीच्या पट्टयात आहे.

पावसाळयात वारे दक्षिण-पश्चिम व उत्तर-पश्चिम दिशातून वाहतात. तर ऑक्टोबर नंतर उत्तर-पूर्व व दक्षिण-पूर्व दिशेने वाहतात. काही धुळीचे वारेही मोठया प्रमाणात वाहतात.

पान क्रं. 6 वर पहा..

1996 मधील पर्जन्यवृष्टी :

| अ. क्रं. | तालुका | पर्जन्यवृष्टी | | सामान्य पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|
| | | 1995 | 1996 | |
| 1. | लातूर | 758.7 | 1000.6 | 714.0 |
| 2. | अहमदपूर | 900.0 | 790.9 | 780.8 |
| 3. | उदगीर | 855.9 | 1117.4 | 902.8 |
| 4. | निलंगा | 805.9 | 926.1 | 711.7 |
| 5. | औसा | 603.7 | 944.0 | 813.9 |
| 6. | रेणापूर | 758.7 | 999.6 | 714.0 |
| 7. | चाकूर | 879.3 | 1171.6 | 780.8 |

6. जमीन :

सामान्यपणे जिल्हयातील जमीन समतल असून किंचीत उताराची आहे. हा उतार दक्षिणेकडे आहे. जिल्हयातील जमीन साधारणपणे दोन भागात विभागलेली आहे.

1. हलकी व मध्यम हलकी
2. भारीकाळी जमीन

अहमदपूर, उदगीर, लातूर व औसा तालुक्याच्या काही भागातील जमीन पहिल्या प्रकारात मोडते. येथील जमीन सर्वसाधारणपणे हलकी व मध्यम हलकी असून कमी आद्रता शोषणारी असल्याने खरीप पिकासाठी योग्य आहे. निलंगा तालुक्यातील काही जमीन तांबडया रंगाची (जांभा) खडकाळ आहे. दुस-या प्रकारामध्ये लातूर व औसा तालुक्याचा काही भाग येतो. ही जमीन भारी व काळीची असून येथे रब्बीची पिके येतात.

7. जंगले :

जिल्हयात जंगलव्याप्त क्षेत्र नगण्य आहे. त्यामुळे जमीनीची धूप मोठया प्रमाणात होते.

8. जिल्हयाच्या पृष्ठभागाखाली पाण्याची पातळी सर्वसाधारणपणे 15.90 मीटरवर आढळून येते. तालुकानिहाय पाण्याची पातळी खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | लातूर | 13.90 |
| 2. | अहमदपूर | 16.80 |
| 3. | उदगीर | 16.70 |
| 4. | निलंगा | 18.60 |
| 5. | औसा | 13.50 |

## 2. लोकसंख्या

1. 1991 च्या जनगणनेनुसार लातूर जिल्हयाची लोकसंख्या 16,76,341 होती. तालुकानिहाय लोकसंख्येची टक्केवारी येणेप्रमाणे - लातूर 28.59, अहमदपूर 19.21, उदगीर 20.83, निलंगा 17.88, औसा 13.47 टक्के, 1981 ते 1991 या कालावधीमध्ये लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक दर 29.64 होता.

पान क्रं. 7 वर पहा...

**घनता :**

2. महाराष्ट्राच्या 2.39 टक्के क्षेत्रातून वसलेल्या लातूर जिल्हयामध्ये महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी 2.13 टक्के लोक राहतात. प्रति चौ. कि. मी. मागे लोकसंख्येची घनता महाराष्ट्राच्या तुलनेत लातूर जिल्हयाची कमीत कमी म्हणजे 234 व्यक्ती येते. महाराष्ट्राची घनता 257 व्यक्तीची आहे. 1991 च्या क्षेत्रफळाच्या मानाने जिल्हा अंतर्गत तालुकानिहाय घनता पाहिली असता लातूर जिल्हयाची अधिक म्हणजे 308 व्यक्तीची आहे व कमी घनता औसा तालुक्याची 186 आहे. इतर तालुक्याची घनता याप्रमाणे - निलांग 216, उदगीर 213, व अहमदपूर 204.

**ग्रामीण व नागरी लोकसंख्येची रचना :**

3. जवळजवळ 79.60 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. एकूण शहरी 3,41,868 लोकसंख्येपैकी 57.74 टक्के लोक लातूर शहरात, 20.61 टक्के लोक उदगीर शहरात, व बाकीचे 21.66 टक्के अहमदपूर, निलंगा व औसा शहरात मिळून राहतात.

**स्त्री-पुरुष प्रमाण :**

4. स्त्री-पुरुष प्रमाण दर हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या 942 येते. नागरी व ग्रामीण भागातील प्रमाण अनुक्रमे 898 व 954 येते. नागरी भागापेक्षा ग्रामीण भागात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे.

**अनुसूचित जाती व जमाती :**

5. 1991 च्या जनगणनेनुसार जिल्हयातील अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण लोकसंख्येच्या 21.29 टक्के आहे. तसेच महराष्ट्राच्या बाबतीत 20.36 आहे. जिल्हयात अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येपैकी 19.06 टक्के अनुसूचित जातीचे व 2.24 टक्के अनुसूचित जमातीचे आहे.

**कामकरी :**

6. 1991 च्या जनगणनेनुसार जिल्हयात मुख्य काम करणा-यांची संख्या 6,56,243 होती. याचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या 39.14 टक्के येते. एकूण कामक-यापैकी 39.37 टक्के शेतकरी, 39.11 शेतमजूर, 0.92 घरगुती उद्योगधंद्यासह वस्तूनिर्माण प्रक्रिया, साधारण दुरुस्ती व उद्योगधंदे यात गुंतलेले आहेत. 20.60 टक्के लोक इतर काम करणारे आहेत. याशिवाय सिमांतिक काम करणा-यांची संख्या 79.080 आहे. व त्याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी 4.71 टक्के येते.

**साक्षरता :**

7. 1991 च्या जनगणनेनुसार जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी 55.57 टक्के लोक साक्षर असून महाराष्ट्राचे हेच प्रमाण 65 टक्के आहे. साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात अधिक आहे. ग्रामीण भागात एकूण 51.63 व नागरी भागात 70.87 टक्के लोक साक्षर आहेत. ग्रामीण भागात तालुकानिहाय टक्केवारी म्हणजेच 53.02 टक्के लातूर तालुक्याची आहे. तर याउलट उदगीर तालुक्याची सर्वात कमी टक्के 50.36 आहे. नागरी

पान क्रं. 8 वर पहा...

भागात अधिक टक्केवारी 73.13 उदगीर शहराची आहे. आणि कमी टक्केवारी 64.93 निलंगा शहराची आहे. तसेच पुरुषातील/ स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणामध्ये बरीच तफावत दिसून येते. पुरुष स्त्रियातील यांचे प्रमाण अनुक्रमे 70.47 टक्के व 39.74 टक्के आहे. ग्रामीण भागातील पुरुषाची जास्त टक्केवारी 68.71 टक्के अहमदपूर तालुक्यात आहे व सर्वात कमी टक्केवारी 65.82 टक्के औसा तालुक्यात आहे. त्याप्रमाणे स्त्रियांच्या बाबतीत अधिक टक्केवारीचे प्रमाण लातूर तालुक्यात 37.25 टक्के आहे. सर्वात कमी अहमदपूर तालुक्याची 35.23 टक्के आहे. नागरी भागाच्या संदर्भात सर्वात जास्त पुरुषाची टक्केवारी उदगीर शहराची 84.45 टक्के व सर्वात कमी अहमदपूर तालुक्याची 78.44 टक्के आहे. स्त्रियांच्या बाबतीत अधिक टक्केवारी उदगीर शहरात 60.37 टक्के व कमी निलंगा शहराची 49.69 टक्के आहे. ग्रामीण भागातील एकूण साक्षर लोकसंख्येपैकी पुरुष व स्त्रियांची टक्केवारी अनुक्रमे 67.18 व 35.35 टक्के आहे. तर नागरी भागामध्ये त्याचे प्रमाण अनुक्रमे 82.83 व 57.44 टक्के आहे. ग्रामीण भागातील स्त्री-पुरुषापेक्षा शहरी भागातील स्त्री-पुरुषामध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

**व्याप्त व निवासी घरे व कुटुंबे :**

8. 1991 च्या जनगणनेनुसार जिल्हयात वापरातील निवासी 2.81 लक्ष घरे आहेत. व या घरात एकूण 2.84 लक्ष कुटुंबे राहतात. 1981 च्या जनगणनेनुसार जिल्हयात निवासी उपयोगी (रेणापूर मंडळ धरुन) 2.18 लक्ष घरे व वापरात 2.20 लक्ष कुटुंबे राहत होती.

## 3. वनसंपत्ती

1. जिल्हयात जंगल क्षेत्राचे अत्यल्प प्रमाण आढळते. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 0.35 टक्के जंगल क्षेत्र (2500 हेक्टर) आहे. परंतू झाडे मात्र विखरलेली आहेत. बाभूळ, खैर, बैल, आपटी, धावडी, बोर, आरोणी, हिवर ही झाडे व केकताड किंवा घायपात इत्यादी आढळतात. पठारी भागात डोंगरावर गवत आढळते. अहमदपूर तालुक्यात बेट नावाच्या डोंगरावर अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती सापडतात.

2. वन क्षेत्र नसल्यामुळे वनउत्पादन सुध्दा अगदी नगण्य आहे. 1996-97 मध्ये तेंदू पानाचे उत्पादन 1031 गोणी झाले, त्याच्या विक्रीची किंमत 125.00 हजार होती.

## 4. कृषी

लातूर जिल्हयातील अर्थव्यवस्था कृषी व कृषीवर आधारित उद्योग यांच्यावरच आधारित आहे. 1991 च्या जनगणनेनुसार एकूण कामक-यापैकी 79% कामकरी शेतकरी व शेतमजूर आहेत. येथील शेती ही पुर्णपणे निसर्गाच्या हातात आहे. हा जिल्हा अशाश्वत पावसाच्या पट्टयात येत असल्याने जिल्हयात खरीप व रब्बी दोन्ही प्रकारची पिके घेतली जातात. परंतू खरीप पिकांचे प्रमाण जास्त आहे.

जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्र 7,15,700 असून त्यापैकी 93.14 टक्के क्षेत्र लागवडीलायक आहे. तहसीलनिहाय जमीन वापराबाबतची माहिती 1993-94 या वर्षाची स्थायी स्वरुपात खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

पान क्रं. 9 वर पहा..

| तालुका/ तहसील | एकूण भौगोलिक क्षेत्र | जंगल व्याप्त क्षेत्र | शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र अकृषिक व पडीत | पडीक जमीन व्यतिरिक्त लागवड न केलेली जमीन | पडीत जमीन | लागवडी खालील एकूण क्षेत्र | लागवडी लायक क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. लातूर | 94256 | 88 | 4615 | 4866 | 1633 | 128371 | 87698 |
| 2. अ. पूर | 86376 | 229 | 3354 | 3401 | 5344 | 89828 | 80311 |
| 3. उदगीर | 143894 | 1260 | 5897 | 17370 | 17188 | 107266 | 132014 |
| 4. निलंगा | 136868 | 85 | 4496 | 3976 | 18109 | 134660 | 130063 |
| 5. औसा | 120373 | - | 4831 | 4995 | 22694 | 103468 | 112774 |
| 6. चाकूर | 68336 | 83 | 2490 | 2981 | 8044 | 60881 | 64426 |
| 7. रेणापूर | 65597 | 638 | 330 | 1189 | 14142 | 64746 | 64081 |
| एकूण | 715700 | 2388 | 26013 | 38778 | 87154 | 689220 | 671367 |

1993-94 यावर्षी जिल्हयात एकूण लागवडीलायक क्षेत्रापैकी 561367 हेक्टर इतके क्षेत्र निव्वळ कसलेले क्षेत्र होते. त्याची एकूण लागवडीखालील क्षेत्राशी टक्केवारी 81.45 इतकी येते. तर दुसोटा क्षेत्र 127853 हेक्टर होते. दुसोटा क्षेत्राची टक्केवारी निव्वळ कसलेल्या क्षेत्राशी 22.78 टक्के इतकी येते.

जिल्हयात तृणधान्ये हीच मुख्य खाद्य पिके आहे. त्यापैकी ज्वारी (खरीप व रब्बी) गहू व तांदूळ या पिकाखाली फार मोठे क्षेत्र येते. विशेषत: ज्वारी हे पिक जिल्हयातील मुख्य पीक आहे. ज्वारीखालील सन 1993-94 यावर्षी खरीप व रब्बी दोन्ही मिळून 215267 हेक्टर असून त्याची एकूण लागवडीखालील क्षेत्राशी टक्केवारी 31.23 इतकी येते.

पिकांची एकूण लागवडीखालील क्षेत्राशी तुलना खालील तक्त्यावरुन दिसून येईल.

पान क्रं. 10 वर पहा..

| अ. क्रं. | पिकांचा प्रकार | पिकाखालील क्षेत्र | एकूण लागवडीखालील क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | तांदूळ | 24027 | 3.49 |
| 2. | गहू | 21193 | 3.07 |
| 3. | ज्वारी | 215267 | 31.23 |
| | खरीप | 177465 | 25.75 |
| | रब्बी | 37802 | 5.48 |
| 4. | बाजरी | 11973 | 1.74 |
| 5. | मका | 4172 | 0.61 |
| 6. | नाचणी | 458 | 0.07 |
| 7. | इतर तृणधान्ये | 1360 | 0.20 |
| 8. | वरी | 332 | 0.05 |
| | एकूण तृणधान्ये | 278782 | 40.45 |
| 9. | हरभरा | 27265 | 3.96 |
| 10. | तूर | 59802 | 8.68 |
| 11. | मूग | 28139 | 4.08 |
| 12. | इतर कडधान्ये | 4102 | 0.60 |
| | एकूण कडधान्ये | 179353 | 26.02 |
| | एकूण अन्नधान्ये | 458135 | 66.47 |
| 13. | ऊस | 11815 | 1.71 |
| 14. | मसाला, फळे व भाजीपाला | 8237 | 1.20 |
| | इतर संकीर्ण खाद्य पिके | 252 | 0.04 |
| | एकूण खाद्य पिके | 478439 | 69.42 |
| 15. | कापूस व इतर तंतू पिके | 34176 | 4.96 |
| 16. | एकूण गळीताची पिके | 174937 | 25.38 |
| 17. | इतर संकीर्ण अखाद्य पिके | 1668 | 0.24 |
| | एकूण अखाद्य पिके | 210781 | 30.58 |
| | लागवडीखालील एकूण क्षेत्र | 689220 | 100.00 |

पान क्रं. 11 वर पहा..

**महत्वाच्या पिकाचे एकूण उत्पन्न व दर हेक्टरी उत्पादन :**

1996-97 यावर्षी जिल्ह्यात एकूण धान्य उत्पादन 401200 मे. टन. इतके झाले या धान्योत्पादनात ज्वारीचा वाटा (खरीप + रब्बी) 345300 मे. टन. इतका होता. एकूण धान्योत्पादन प्रति हेक्टरी 1503 किलो झाले. तर ज्वारीचे उत्पादन प्रति हेक्टरी 1653 किलो इतके झाले. मागील वर्षी म्हणजेच 1995-96 मध्ये ज्वारीचे उत्पादन प्रति हेक्टरी 2275 किलो इतके होते. 1996-97 या वर्षी कडधान्याचे एकूण उत्पादन 1045500 मे. टन. इतके झाले. याचे प्रति हेक्टरी उत्पादन प्रमाण 539 किलो होते. कडधान्यामध्ये तूरीचे उत्पादन 41200 मे. टन. इतके झाले. याचे प्रति हेक्टरी उत्पादन 611 किलो इतके आहे.

**रासायनिक खताचा वापर :**

1996-97 मध्ये जिल्ह्यात 75047 मे. टन. रासायनिक खताचे वाटप करण्यात आले. 1995-96 मध्ये 74664 मे. टन. इतके होते. 1996-97 यावर्षी खताच्या वापरामध्ये 0.53 टक्के वाढ मागील वर्षाच्या तुलनेत झाल्याचे दिसून येते.

**पीक संरक्षण उपाययोजना :**

1996-97 मध्ये पीक संरक्षणाची उपाययोजना करण्यात आली. यामध्ये विशेषतः कापसावरील बोंड अळीचे नियंत्रण, तुरीवरील शेंगा, पोखरणारी अळी, भुईमुगावरील पाने गुंडाळणारी अळी यावरील नियंत्रणासाठी कृषी खात्यामार्फत विशेष प्रयत्न करण्यात आले.

**कृषी उत्पन्न पणन व्यवस्था :**

जिल्ह्यात एकूण 6 कृषी उत्पन बाजार समित्या, 15 उपबाजार समित्या आहेत. त्या पुढील प्रमाणे आहेत.

| बाजार समित्या | उपबाजार पेठा |
|---|---|
| 1. लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती, लातूर | 1. रेणापूर 2. पानगांव 3. मुरुड |
| 2. अ. पूर कृषी उत्पन्न बाजार समिती, अ. पूर | 1. शिरुर ताजबंद 2. किनगांव 3. हाडोळती |
| 3. उदगीर कृषी उत्पन्न बाजार समिती, उदगीर | 1. जळकोट 2. देवणी 3. वाठवणा 4. हळी |
| 4. निलंगा कृषी उत्पन्न बाजार समिती, निलंगा | 1. औराद शहाजनी 2. कासारशिर्सी |
| 5. औसा कृषी उत्पन्न बाजार समिती, औसा | 1. किल्लारी 2. उजनी |
| 6. चाकूर कृषी उत्पन्न बाजार समिती, चाकूर | 1. नळेगांव 2. चापोली |

या नियंत्रित बाजारपेठातून शेतमालाची खरेदी-विक्री होत असते. 1996-97 मध्ये या नियंत्रित बाजारपेठेत 283757 मे. टन. मालाची आवक झाली. ही आवक मागील वर्षाच्या तुलनेत 62854 मे. टनाने वाढलेली आहे.

पान क्रं. 12 वर पहा....

1996-97 मधील मुख्य पिकाची आवक व मागील वर्षाची तुलना दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे -

| अ. क्रं. | तपशील | 1995-96 | 1996-97 | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| 1. | एकूण आवक | 220903 | 283757 | 62854 वाढ |
| 2. | तृणधान्ये | 54908 | 69533 | 14625 वाढ |
| 3. | कडधान्ये | 89436 | 148342 | 58906 वाढ |
| 4. | तेलबिया | 24593 | 16170 | 8423 घट |
| 5. | गुळ | 28446 | 23205 | 5241 घट |
| 6. | कपाशी | 13211 | 13559 | 348 वाढ |
| 7. | इतर कृषीमाल | 10309 | 12948 | 2639 वाढ |

यावरुन असे निदर्शनास येते की, 1995-96 पेक्षा 1996-97 मध्ये तेलबिया व गुळ वगळता सर्व पिकाच्या उत्पादनात वाढ झाली आहे.

**वहीत धारण जमिनीचे क्षेत्रफळ व खातेदारांची संख्या :**

1990-91 च्या कृषी गणनेनुसार जिल्हयात एकूण 231904 खातेदार असून त्यांनी धारण केलेली जमीन 646235 हेक्टर होती.

वहीत जमीन धारण व खातेदाराचे प्रमाण याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्रं. | क्षेत्रफळाची श्रेणी | एकूण धारण खातेदार | एकूण धारण केलेली जमीन (हेक्टर) | एकूण खाते-दाराशी प्रमाण | एकूण धारण केलेल्या जमीनीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 0.0 ते 1.0 | 39907 | 26952 | 17.21 | 4.17 |
| 2. | 1.0 ते 2.0 | 75562 | 109934 | 32.58 | 17.01 |
| 3. | 2.0 ते 4.0 | 68269 | 190047 | 29.44 | 29.41 |
| 4. | 4.0 ते 10.0 | 43100 | 252212 | 18.59 | 39.03 |
| 5. | 10.0 ते 20.0 व त्यापेक्षा अधिक | 5066 | 67090 | 2.18 | 10.38 |
| | एकूण | 231904 | 246235 | 100.00 | 100.00 |

पान क्रं. 13 वर पहा..

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, 1.0 ते 2.0 हेक्टर जमीन धारण करणाऱ्या खातेदाराचे प्रमाण अधिक म्हणजे 32.58 टक्के इतके आहे व त्यांनी धारण केलेले क्षेत्र 17.01 टक्के आहे. 10.00 ते 20.00 हेक्टर व त्याहून अधिक जमीन धारण करण्याचे प्रमाण 2.18 टक्के आहे व त्यांनी धारण केलेले क्षेत्र 10.33 टक्के आहे.

## 5. जलसिंचन

जलसिंचनाचे साधन :

जिल्ह्यातील उपलब्ध जलसंपत्तीच्या केलेल्या अभ्यासानुसार लातूर जिल्ह्यातील लागवडीलायक उपलब्ध क्षेत्र 671367 हेक्टर क्षेत्रापैकी 117815 हेक्टर क्षेत्राला पाटबंधा-यामार्फत ओलिताची सोय उपलब्ध करुन देता येईल. हे क्षेत्र लागवडीलायक क्षेत्राच्या 17.52 टक्के आहे. त्याचा प्रकल्प प्रकारानुसार तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्रं | प्रकार | प्रकल्प संख्या | एकूण सिंचन क्षेत्र |
|---|---|---|---|
| 1. | मोठे प्रकल्प | 2 | 32924 |
| 2. | मध्यम प्रकल्प | 8 | 22871 |
| | एकूण | 10 | 55795 |

1993-94 वर्षी 44445 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली होते. त्यापैकी विहीरीव्दारे 26679 हेक्टर क्षेत्र मिळले होते. उर्वरित 5103 कालव्याव्दारे होते. 1993-94 वर्षी जिल्ह्यात 25363 सिंचन विहीरी आहेत.

**ओलिताखालील पिकाचे क्षेत्र :**

1993-94 यावर्षी एकूण लागवडीलायक क्षेत्र 671367 हेक्टर क्षेत्रापैकी 44445 हेक्टर क्षेत्र एकूण ओलिताखाली होते. एकूण ओलिताखालील क्षेत्रापैकी अन्नधान्याखाली 21926 हेक्टर, उसाखाली 11815 हेक्टर, गळीताच्या पिकाखाली 3602 हेक्टर तर इतर पिकाखालील 7102 हेक्टर क्षेत्र होते.

**जलसिंचन प्रकल्प बांधणी कार्यक्रम :**

जिल्ह्यात पूर्ण झालेले मोठ, मध्यम व लघु प्रकल्प 192 असून 49 प्रकल्पाचे बांधकाम सुरु आहे. 19 प्रकल्पांना मंजूरी मिळाली असून त्यांचे काम अद्याप सुरु झालेले नाही. 50 प्रकल्पाचे अन्वेषणाचे काम सुरु असून भविष्यात 113 प्रकल्प घेता येतील. त्यांची वर्गवारी खालील प्रमाणे आहे.

पान क्रं. 14 वर पहा..

| अ. क्रं. | प्रकार | पूर्ण झालेले प्रकल्प | बांधकाम चालू असलेले प्रकल्प | मंजूर परंतू चालू न झालेले प्रकल्प | अन्वेषणाखालील प्रकल्प | भविष्य कालीन प्रकल्प | एकूण प्रकल्प |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | मोठे प्रकल्प | 2 | 1 | - | - | - | 3 |
| | मध्यम प्रकल्प | 7 | 4 | - | - | - | 11 |
| | लघु प्रकल्प (को. प. ब. सह) राज्यस्तरीय | 66 | 14 | 2 | 25 | 20 | 124 |
| | उपसा सिंचन | 9 | - | - | - | - | 9 |
| | लघु तलाव (को. प. ब. सह) स्थानिकस्तर | 11 | 30 | 17 | 25 | 93 | 276 |
| | एकूण | 192 | 49 | 19 | 50 | 113 | 423 |

**पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय सेवा व दुग्धव्यवसाय :**

जिल्हयात 1992 च्या पशुगणनेनुसार एकूण पशुधन 855359 इतके आहे. निरनिराळ्या प्रकारानुसार त्यांची टक्केवारी पुढीलप्रमाणे -

| अ. क्रं. | पशुधनाचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | संकरीत बैल | 2130 | 0.25 |
| 2. | गाई | 13751 | 1.61 |
| 3. | देशी बैल | 165353 | 19.33 |
| 4. | गाई | 114729 | 13.41 |
| 5. | संकरीत वासरे | 10809 | 1.26 |
| 6. | देशी वासरे | 83421 | 9.75 |
| 7. | रेडे | 1609 | 0.19 |
| 8. | म्हशी | 117296 | 13.71 |
| 9. | तीन वर्षावरील म्हशी व रेडे | 76844 | 8.99 |
| 10. | मेंढया | 44083 | 5.15 |
| 11. | बक-या | 169589 | 19.83 |
| 12. | घोडे | 308 | 0.04 |
| 13. | इतर पशुधन | 55437 | 6.48 |
| | एकूण पशुधन | 855359 | 100.00 |

पान क्रं. 15 वर पहा....

याव्यतिरिक्त जिल्हयात बदके व कोंबडया यांची संख्या 205526 इतकी होती. दर चौ. कि. मी. मध्ये पशुधना ची घनता 116 इतकी आहे.

**पशुवैद्यकीय सेवा :**

जिल्हयात 1996-97 ए. वर्षात 235 चिकित्सालये, दवाखाने, मदत केंद्रे यांच्या मार्फत 447934 जनावरावर उपचा करण्यात आले तर 128 कृत्रिम रेतन केंद्राव्दारे 47447 जनावराचे कृत्रिम रेतन करण्यात आ ले.

**मत्स्यव्यवसाय**

1996-97 यावर्षात जिल्हयातील विविध जलाशयामध्ये एकूण 53.00 लक्ष मत्स्यबीज सोडण्यात आले. त्या तून 1790 मे. टन. मासळीचे उत्पादन झाले. जिल्हयात एकूण 63 मच्छीमार सहकारी संस्था असून या संस्थातून 1184 सभासद आहेत. जिल्हयात धरणी मध्यम प्रकल्पाजवळ मत्स्यबीज उत्पादन केंद्र कार्यरत असून येथे तयार होणारे मत्स्यबीज जिल्हयातील निरनिराळया जलाशयामध्ये सोडण्यात येते.

**वीज**

1991 च्या जनगणनेनुसार अस्तित्वात असलेल्या सर्व गांवाचे 98.18 % विद्युतीकरण झाले असून जिल्हयात औष्णिक विद्युत केंद्र परळी मार्फत विद्युत पुरवठा होतो. 1996-97 मध्ये 647840 कि. वॅट तास वीजेचा वापर करण्यात आला. 1995-96 च्या तुलनेत हा वापर 157903 किलोवॅटने जास्त आहे. एकूण वीज वापरापैकी 9.25 टक्के घरगुती वापरासाठी, 1.82 व्यापारी कामासाठी, 7.10 टक्के औद्योगिक, 1.01 टक्के सार्वजनिक दिवाबत्तीसाठी व 3.86 टक्के इतर कामसाठी तर 76.96 टक्के वापर कृषी पंपासाठी करण्यात आला.

**उद्योग व खाणकाम**

जिल्हयात 1996 अखेर एकूण 175 कारखाने नोंदणी करण्यात आले असून त्यापैकी 31 कारखाने बंद आहेत. या कारखान्यामध्ये 5789 कामगारांना रोजगार मिळाला असून 1996 मध्ये त्यांच्या मार्फत 1362572 मनुष्य दिवस काम झाले आहे.

**मार्ग वाहतूक व दळणवळण :**

31 मार्च 1996 अखेर जिल्हयात नगरपालिका क्षेत्र वगळता 4806 कि. मी. लांबीचे रस्ते होते. मार्च 1997 अखेर त्यात 666 कि. मी. रस्त्याची भर पडली व एकूण रस्त्यांची लांबी 5472 इतकी झाली. जिल्हयात 83 कि. मी. ब्रॉडगेज व 65 कि. मी. नॅरोगेज एकेरी रेल्वे मार्ग आहेत.

**नोंदणी झालेली वाहने :**

जिल्हयात 31 मार्च 1997 अखेर एकूण 35566 वाहने नोंदविलेली आहेत. त्यात स्वयंचलित दुचाकी वाहनांची संख्या सर्वाधिक आहे. प्रमुख प्रकारानुसार वाहनाची वर्गवारी पुढील प्रमाणे आहे.

पान क्रं. 16 वर पहा..

| अ. क्रं. | वाहनाचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | दुचाकी वाहने | 23487 | 66.04 |
| 2. | स्वयंचलित रिक्ष | 1667 | 4.69 |
| 3. | मोटारी, जीप, स्टेशनवॅगन | 2814 | 7.91 |
| 4. | स्टेज कॅरेजेस | 353 | 0.99 |
| 5. | ट्रॅक्टर | 2257 | 6.35 |
| 6. | माल मोटारी | 2462 | 6.92 |
| 7. | ट्रेलर्स | 2385 | 6.71 |
| 8. | टॅक्सी कब्ज | 101 | 0.28 |
| 9. | इतर | 40 | 0.11 |
| | एकूण | 35566 | 100.00 |

या व्यतिरिक्त राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या 393 बसगाडया 477 मार्गावर धावत होत्या. प्रवाशांची दैनंदिन सरासरी 2 लक्ष 13 हजार असून वाहतुकीमुळे महामंडळास 48 कोटी 19 लक्ष 37 हजार इतके उत्पन्न मिळाले.

जिल्हयात मार्च 1997 अखेर 19920 दुरध्वनी होते तर 294 डाकघरे होती.

**रोजगार**

सेवायोजन कार्यालयाच्या आकडेवारी नुसार 1996-97 मध्ये निरनिराळया उद्योगात 27665 व्यक्ती कामावर होत्या. त्यापैकी 8531 व्यक्ती शासकीय सेवेत, 6709 व्यक्ती निमशासकीय सेवेत तर 12425 व्यक्ती खाजगी उद्योगात कार्यरत होत्या. त्यांची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे -

